आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१५ सप्टेंबर २०२५ - सोमवार

**ठळक बातम्या**

- वक्फ सुधारणा कायद्याला पूर्ण स्थगिती द्यायला सर्वोच्च न्यायालयाचा नकार/ तीन तरतुदींना दिली तात्पुरती स्थगिती
- कृत्रिम बुद्धीमत्तेच्या वापराबाबत निती आयोगाचा धोरण अहवाल प्रसिद्ध
- नवनियुक्त राज्यपाल आचार्य देवव्रत यांचा शपथविधी

**आणि**

- राज्यात पुन्हा पावसाचा जोर, अनेक भाग जलमय

**<><><><><>**

सर्वोच्च न्यायालयानं वक्फ सुधारणा कायदा २०२५ ला पूर्णपणे स्थगिती द्यायला नकार दिला असून या कायद्यातल्या काही तरतुदींना स्थगिती दिली आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई आणि न्यायमूर्ती ए जी मसीह यांच्या खंडपीठानं हा निर्णय दिला. वक्फ करण्यासाठी देणगीदार किमान पाच वर्षे इस्लाम धर्माचा अनुयायी असावा ही तरतूद न्यायालयानं स्थगित केली आहे. वक्फ मालमत्तेचं सरकारी मालमत्तेवर अतिक्रमण झालं की नाही हे ठरवण्याचा अधिकार शासनानं नेमलेल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांना बहाल करण्यालाही खंडपीठानं स्थगिती दिली आहे. तसंच वक्फ बोर्डावर मुस्लिमेतर व्यक्तीची नेमणूक करण्याची तरतूद यासंदर्भात राज्य सरकारांनी ठोस नियम करेपर्यंत स्थगित राहील असं न्यायालयानं स्पष्ट केलं.

आज दिलेला निवाडा प्रथमदर्शनी निरीक्षणांवर आधारित असून, खटल्याची सविस्तर सुनावणी नंतर होईल असंही न्यायालयानं सांगितलं.

**<><><><><>**

वक्फ दुरुस्ती विधेयकावरच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचं केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी स्वागत केलं आहे. मुंबईत माध्यमांशी बोलताना त्यांनी ही प्रतिक्रिया दिली. प्रदीर्घ काळ चाललेल्या चर्चेनंतर हे विधेयक संसदेत मंजूर झालं असून त्याचा लाभ सर्व मुस्लीम समुदायाला होईल, असं ते यावेळी म्हणाले. सरकारने या विधेयकामागचे तर्क आणि तथ्यं न्यायालयासमोर सादर केले आहेत. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल हा विधेयकामागच्या दृष्टिकोनाचा विजय असल्याचं रिजिजू म्हणाले.

मुंबई विद्यापीठाच्या कलिना परिसरात भाषिक वारसा आणि सांस्कृतिक अभ्यास केंद्राचं भूमिपूजन आज रिजिजू यांच्या हस्ते झालं. या कार्यक्रमात मुंबई विद्यापीठाशी संलग्न विविध संस्थांमधल्या शिक्षकांचा सत्कारही करण्यात आला. अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालयाचे सचिव डॉ. चंद्रशेखर कुमार, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्राध्यापक रवींद्र कुलकर्णी आणि इतर उपस्थित होते.

**<><><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वेगानं वाढत असल्यामुळे त्याचं नियमन सुद्धा तितकंच आवश्यक झालं आहे, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. टेक रिपॉजिटरी आणि विकसित भारत संकल्पनेसाठी कृत्रिम बुद्धीमत्तेच्या वापरासाठीच्या धोरणाचा अहवाल निती आयोगानं आज नवी दिल्लीत सादर केला, त्यावेळी अर्थमंत्री बोलत होत्या. कृत्रिम बुद्धीमत्तेच्या वापराबाबत नागरिकांनी जागरूक राहायला हवं, देशातल्या सर्व जिल्ह्यांमधे विकास साधण्यसाठी कृत्रिम बुद्धीमत्तेवर आधारित तंत्रज्ञानाचा स्वीकार करायला हवा असं त्या म्हणाल्या.

सक्षम तंत्रज्ञानाच्या सहाय्याने देशात सर्वसमावेशक विकास होत असल्याचं माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी यावेळी सांगितलं. जगात मोठ्या

प्रमाणात अस्थिरता असूनही भारत जलद गतीने प्रगती करत आहे, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा कर परिषदेनं नुकतंच अनेक क्षेत्रातल्या वस्तू आणि सेवा करात सुधारणा केली आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळणार असून अनेक व्यवसायाच्या वाढीसाठीही मदत होणार आहे. नव्या कररचनेनुसार बांधकाम साहित्यावरल्या जीएसटीतही सुधारणा झाली आहे. यामुळे बांधकाम व्यवसाय आणि ग्राहक या दोघांनाही फायदा होणार आहे. याबाबत अधिक जाणून घेऊया….

**व्हॉईस कास्ट- रश्मी पाटकर**

*नव्या कररचनेनुसार सिमेंटवरील जीएसटी दर २८ टक्क्यावरून १८ टक्के, वाळू-चुना- विटा यावरील जीएसटी १२ टक्क्यावरून ५ टक्के तसंच संगमरवर आणि ग्रॅनाईट ब्लॉक्सवरील जीएसटीही १२ टक्क्यावरून ५ टक्के करण्यात आला आहे. यामुळे या वस्तू नागरिकांना परडवणाऱ्या दरात उपलब्ध होऊन यांची मागणी वाढेल. याचा सकारात्मक परिणाम प्रधानमंत्री आवास योजनेसारख्या उपक्रमांवर पडणार असून अधिकाधिक नागरिकांचं घराचं स्वप्न पूर्ण व्हायला मदत मिळणार आहे. यामुळे शहरी आणि ग्रामीण पायाभूत सुविधांमधे वाढ होईल, सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग बळकट होतील आणि रोजगार निर्मिती होईल.*

**<><><><><>**

नवनियुक्त राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज मुंबईच्या राजभवनात राज्यपाल पदाची शपथ घेतली. मुंबई उच्च नायायालयाचे मुख्य न्यायाधीश श्री चंद्रशेखर यांनी आचार्य देवव्रत यांना पदाची शपथ दिली. आचार्य देवव्रत यांनी संस्कृत भाषेत शपथ घेतली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह इतर मान्यवर उपास्थित होते. माजी राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची देशाच्या उपराष्ट्रपतीपदी निवड झाल्यामुळे गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांना महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात

आला आहे. आचार्य देवव्रत हे २०१९ पासून गुजरातचे राज्यपाल आहेत. त्याआधी त्यांनी हिमाचल प्रदेशाचे राज्यपाल म्हणून जबाबदारी सांभाळली होती.

**<><><><><>**

सेवा आणि सुशासन या मूल्यांच्या आधारवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली केंद्र सरकारचं कामकाज सुरू आहे. सेवा पर्व या विशेष मालिकेच्या अंतर्गत आज आपण नमामी गंगे मोहिमेद्वारे गंगा नदीच्या परिस्थितीत झालेले बदल जाणून घेऊया.

**होल्ड कॅप्सूल**

जून २०१४ मध्ये केंद्र सरकारनं नमामी गंगा मोहिमेला सुरुवात केली. गंगा नदीची स्वच्छता ही सर्वांची सामूहीक जबाबदारी असल्याचं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं होतं.

**प्रधानमंत्री बाइट**

प्रदुषण नियंत्रण, जैविक परिसंस्थांचं पुर्नरोपण, क्षमता विकास आणि नागरिकांचा सहभाग या निकषांवर नमामी गंगा मोहिम अवलंबून आहे. नदीचा पर्यावरणीय दृष्टीकोनातून विचार आणि त्यावर अवलंबून असलेल्या लाखो लोकांच्या आजिविकेचा विचार यामागे आहे. गेल्या ११ वर्षात सांडपाणी पुनर्प्रक्रियेची क्षमता ३० पटींनी वाढली आहे. नदीतल्या पाण्याचा दर्जा सुधारल्यानं यात आढळून येणाऱ्या डॉल्फिनची संख्याही वाढली आहे.

**प्रधानमंत्री बाइट**

नमामी गंगा मोहिमेमुळे कित्येक वर्ष अशक्य वाटत असणारं स्वच्छ गंगा नदीचं स्वप्न आता प्रत्यक्षात येताना दिसतं आहे.

**<><><><><>**

राज्यात  मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दुपारी मंत्रालयातल्या राज्य आपत्कालिन कार्य केंद्राला भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. बीड जिल्ह्यातील आष्टी पाथर्डी तालुक्यातील काही गावांमधे  पुरात अडकलेल्या ४० ग्रामस्थांना एनडीआरएफच्या मदतीने एअरलिफ्ट करून सुरक्षित ठिकाणी हलवावे असे निर्देश त्यांनी दिले. संबंधित जिल्ह्यातल्या मदत आणि बचाव कार्याची माहिती त्यांनी घेतली.  आणि जिल्हा प्रशासनाला सतर्कतेच्या सूचना दिल्या.

मुंबईत जिथे जिथे पाणी साचल्याच्या तक्रारी येत आहेत तिथे अतिरीक्त मनुष्यबळ तैनात करून लवकरात लवकर पाण्याचा निचरा होण्यासाठी पंप बसविण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

**<><><><><>**

राज्यात पुन्हा एकदा पावसाने जोर धरला आहे. काल मध्य रात्रीपासून राज्याच्या अनेक भागांमध्ये मुसळधार पाऊस होत आहे. मुंबईत जोरदार पावसामुळे अनेक सखल भागांत पाणी साचलं आहे. त्यामुळे रस्ते आणि रेल्वे वाहतूक संथगतीनं होत आहे. मध्य रेल्वे च्या  कुर्ला, आणि पश्चिम रेल्वेच्या बांद्रा स्थानकांजवळ रुळांवर पाणी साचलं होतं.

मुंबईत सुरु असलेल्या जोरदार पावसामुळे वडाळा इथं मोनोरेलमध्ये तांत्रिक बिघाड झाला आणि ती बंद पडली. यातल्या सर्व १७ प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढण्यात आलं. त्यानंतर मोनोरेलला कपलिंग करून पुढे नेण्यात आलं असून आता मोनोरेलच्या दोन्ही मार्गांवरच्या सेवा पूर्णपणे सुरळीत झाल्या असल्याचं एमएमआरडीएनं सांगितलं आहे.

**<><><><><>**

**अहिल्यानगर** जिल्ह्यात गेल्या दोन दिवसापासून संततधार पाऊस सुरू आहे. गर्भगिरी डोंगर रांगामध्ये काल रात्री झालेल्या पावसामुळं पाथर्डी तालुक्यातल्या करंजी येथील नदीला महापूर आला आहे. अहिल्यानगर-पाथर्डी तसंच शेवगाव महामार्गावरच्या नद्यांनाही पूर आला आहे. तिसगाव परिसरातल्या नदीवरच्या पुलावरून पाणी वाहू लागल्यानं वाहतूकित अडथळा निर्माण झाला आहे. दुथडी भरून वाहणाऱ्या नद्यांचं पाणी काठावरच्या गावांमध्ये शिरलं आहे. त्यामुळं जनजीवन विस्कळीत झालं असून नागरिकांचा संपर्क तुटला आहे.

मराठवाड्यातल्या **हिंगोली, परभणी, नांदेड, लातूर तसंच बीड** जिल्ह्याच्या काही भागात गेले दोन दिवस संततधार पाऊस सुरु आहे. मांजरा, तेरणा आणि जायकवाडी धरणाचे दरवाजे उघडणं भाग पडलं आहे. त्यामुळं सर्वत्र पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळं शेतपिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं असून शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे. प्रशासनानं तातडीने पंचनामे करून तात्कळ नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी केली जात आहे.

**परभणी** शहरासह भोवतालच्या परिसराला पावसानं झोडपून काढलं आहे. शहरातले बहुतेक रस्ते जलमय झाले आहेत. त्या व्यतिरिक्त सखल भागातल्या वसाहतींमध ल्या घरांमध्ये पाणी शिरलं आहे. त्यामुळं नागरिकांची तारांबळ उडाली आहे.

**सोलापूर** जिल्ह्यात गेल्या आठवड्या पासून अतिवृष्टी होत आहे. उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूरसह अक्कलकोट तालुक्यातल्या शेतपिकांचं मोठं नुकसान झालं आहे. अनेक घरांची पडझड झाली आहे. या सगळ्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून नागरिकांना तात्काळ भरपाई मिळवून द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले आहेत.

**<><><><><>**

हवामान विभागाने रायगड जिल्हा  आणि पुणे जिल्ह्यातल्या घाट परिसराला मुसळधार पावसाचा रेड अलर्ट दिला आहे. मुंबई, ठाणे, रत्नागिरी, पालघर, अहिल्यानगर, सातारा घाट परिसर, छत्रपती संभाजीनगर, बीड या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. सिंधुदुर्ग, धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, पुणे, कोल्हापूर घाट परिसर, सांगली, सोलापूर, मराठवाडा आणि विदर्भाला मुसळधार पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे.

**//<><><><><>//**